Loksatta, Pune, February 28, 2012. Pp.12



# जीएमआरटीच्या महादुर्बिणीजवळ विज्ञानदिनानिमित्त प्रदर्शन व व्याख्याने

प्रतिनिधी

'नॅशनल सेंटर फॉर रेडिओ ॲस्ट्रोफिजिक्स' या संस्थेतर्फे विज्ञानदिनानिमित्त २८ व २९ फेब्रुवारी दरम्यान विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. हे प्रदर्शन जुन्नरजवळील खोडद येथील महादुर्बिणीजवळ (जीएमआरटी) होणार आहे.

या प्रदर्शनामध्ये 'जीएमआरटी' ही जगातील सर्वात मोठी रेडिओ दुर्बिण व तिच्या विविध प्रणालीबद्दलची माहिती देण्यात येणार आहे. तसेच, जीएमआरटीचा उपयोग करून प्रत्यक्ष सूर्य, पल्सार आदी ग्रहांचे निरीक्षण प्रेक्षकांना दाखवण्यात येणार आहे. या टाटा मूलभूत संशोधन संस्था व होमी भाभा केंद्र, मुंबईच्या ने विविध प्रयोग सादर केले जाणार आहेत. तसे बलून फॅसिलिटी, हैदराबाद यांच्या वतीने वैज्ञानिक बलूनचे उड्डान व त्याचे प्रयोग दाखविण्यात येणार आहेत. यानिमित्ताने प्रदर्शनामध्ये 'सूर्यमालेतील सात आश्चर्ये' या विषयावर लघुपट व मुंबईच्या टीआयएफआर संस्थेतर्फे 'उठे अंधाराचे जाळे' ही लघनाटिका सादर केली जाणार आहे. या व्यतिरिक्त विज्ञानाचे गमतीशीर प्रयोग व विज्ञान विषयावर व्याख्यानांचे आयोजन करण्यात आले आहे. या वेळी 'ताऱ्यांचा जन्म मृत्यू व पुनर्जन्म', 'प्रवास अंटार्क्टिकाचा', 'रासायनिक प्रक्रियेचे नियंत्रण व उपयोग', 'पाणी एक अद्‌भुत रसायन', 'जैविक ऊर्जा', 'जुन्नर मधील पुरातत्त्वकालीन अवशेषांचा इतिहास' या विषयांवर व्याख्यान होणार आहेत.

## पुणे वेधशाळेत प्रदर्शन

भारतीय हवामानशास्त्र विभागातर्फेसुद्धा विज्ञान दिनानिमित्त मंगळवारी शिवाजीनगर येथील पुणे वेधशाळेत प्रदर्शन आयोजन करण्यात आले आहे. त्यात हवामानाची उपकरणे व विविध गोष्टी प्रदर्शित केल्या जाणार आहेत. ते सकाळी १०.३० ते सायंकाळी या वेळेत नागरिकांसाठी खुले राहणार आहे.

## जन्मकुंडल्यांची होळी

दरम्यान, महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीतर्फे विज्ञानदिनाच एक दिवस आधी, सोमवारी जन्मकुंडल्या जाळण्यात आल्य पुण्यात गेल्या काही दिवसांमधये कुंडलीच्या कारणावरून एव व्यक्तिने संपूर्ण कुटुंब संपविल्याची घटना घडली. त्यामुळे समिती नागरिकांना आपापल्या कुंडल्यांची होळी करण्यासाठी एक येण्याचे आवाहन केले होते. त्याला प्रतिसाद देऊन नागरिक आर होते. या कुंडल्यांची होळी करण्याचा कार्यक्रम करण्यात आल असे समितीचे डॉ. नरेंद्र दाभोळकर यांनी सांगितले.